**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :२६ /०५/२०१६

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०३ सोमवार दि.३० /०५/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक- ३० /०५ /२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १६ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०७ गुरूवार दिनांक ३/०३/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट |
| १९ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्वनियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| २० | प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३० प्रभाग क्र.३०मधील आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर सी सी पाईपची पावसाळी गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३१ प्रभाग क्र.३०मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १६ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०७ गुरूवार दिनांक ३/०३/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत.
२] विषय क्रमांक- १७ ते २१ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- १६ सोमवार दि.३०/५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०७ गुरूवार दिनांक ३/०३/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०७ गुरूवार दिनांक ३/०३/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सभा सुरू करा.

सभेच्या सुचने चे वाचन केले.

मा.सभापती साहेब - मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- इतिवृत्त कायम मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.उषा नलवडे :- विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब - प्रस्तावातील सभेचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०७ गुरूवार दिनांक ०३/०३/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम

अनुमोदक :- मा.सौ.उषा नलवडे
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- १७ सोमवार दि.३०/५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११७६ दि. २१/०३/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र. आस्थापना कंत्राटी नेमणुक ५६२९ दि.२६/१०/२०१५ अन्वये १) सौ. मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) , २) सौ. अर्पणा विलास चाबुकस्वार ३) सौ. सुप्रिया अर्जुन टेमकर ४) सौ. स्वप्नाली प्रताप इंगावले ५) सौ. अर्चना संदिप क्षत्रिय ह्या परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने दि. २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करिता कै. बा. दे. दवाखाना येथे हजर झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कलावधी दि. २५/०४/२०१६ रोजी संपत आहे. त्यांचे नेमणूकीच्या कालावधीमध्ये काम समाधानकारक असुन त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक मिळणे बाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिलेला आहे. तरी वरील परिचारीका यांना नेमणूकीचा कालावधी संपल्यानंतर तांत्रिक खंड देऊन दि. २८/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करिता कै.बा.दे.दवाखान्यासाठी परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे. प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ३८० दि.०८/०७/२०१५ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दि. २५/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सार्वमत व दि.०३/०८/२०१५ रोजीच्या दैनिक नगर टाईम्स या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दि. १० / ०९ / २०१५ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने दि.१० / ०९ / २०१५ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष,निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड व प्रतिक्षा सुचीवरील उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार निवड झालेल्या व प्रतिक्षा सुचिवरील निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी हि अहमदनगर महानगरपालिकेच्या नोटीस फलकावर जा.क्र.आस्था. ३८७० दि.१५/०९/२०१५ अन्वये दि.१५/०९/ २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. दि.२५/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सार्वमत व दि.०३/०८/२०१५ रोजीच्या दैनिक नगर टाईम्स या वर्तमान पत्रामध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार

उमेदवारांच्या मुलाखती बाबत खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व त्याप्रमाणे दरमहा मानधन नमुद करुन जाहिराती प्रसिध्दीस देण्यात आलेली होती.

| अं. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | १० | (RGNM) आर.जी.एन.एम.<br>------------------------------------<br>वरील उमेदवार उपलब्ध न झाल्यास ----<br>(RANM) आर.ए.एन.एम. | ८,०००/-<br>-----------<br>६,०००/- |

वरील निवड झालेल्या संबधितांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ५६२९ दि.२६/१० /२०१५ अन्वये खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे सहा महिन्या करिता दरमहा मानधनावर कै.बा.दे.दवाखान्यामध्ये करारबध्द नेमणूक करण्यात आलेली होती.

| अ. क्र. | उमेदवारांचे नाव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| २ | अनिता रमेश पालवे | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ३ | दिपिका धनराज गायकवाड | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ४ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ५ | शितल दिलीप टाक | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ६ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ७ | मिल्का फ्रांन्सिस पाटोळे | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |
| ८ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | ६,०००/ | कै.बा.दे.दवाखाना |
| ९ | मोहीनी अशोक गुंजाळ | परिचारीका | ६,०००/ | कै.बा.दे.दवाखाना |
| १० | जया उध्दव खेडकर | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवाखाना |

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ८६२ दि ०९/१२/२०१५ अन्वयेच्या अहवाला नुसार वरील तक्त्यामधील दर्शविलेले अनु.क्र. २ अनिता रमेश पालवे , अनु.क्र. ३ दिपिका धनराज गायकवाड, अनु.क्र. ५ शितल दिलिप टाक व अनु.क्र. १० जया उध्दव खेडकर हे उपरोक्त जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ५६२९ दिनांक २६/१०/२०१५ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशा नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये रुजु झालेले नाहीत.संदर्भिय प्रस्तावात नमुद केल्याच्या अनुषंगाने संबधितांची कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात करारा नुसार तात्पुरत्या

स्वरुपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. ५६२९ दि.२६/१०/२०१५ | २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २५/०४/२०१६ |
| २ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. ५६२९ दि.२६/१०/२०१५ | २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २५/०४/२०१६ |
| ३ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र. ५६२९ दि.२६/१०/२०१५ | २६/१०/२०१५ | २५/०४/२०१६ |
| ४ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | ८,०००/- | जा.क्र. ५६२९ दि.२६/१०/२०१५ | २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २५/०४/२०१६ |
| ५ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | ८,०००/- | जा.क्र. ५६२९ दि.२६/१०/२०१५ | २६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २५/०४/२०१६ |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ५६२९ दिनांक २६/१०/२०१५ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वस्पात परिचारीका यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक २६ / ०४ / १६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ९ व १० नुसार रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी परिचारिका / सहाय्यक परिचारीका प्रसविका पद मंजुर पद संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या | सद्यस्थितीमध्ये मानधनावरील कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | परिचारीका (जी.एन.एम) | १६ | ------ | १६ | १४ | ११ |
| १० | सहाय्यक परिचारिका / प्रसविका ( ए.एन.एम.) | ०३ | ०६ | ०९ | | |
| | एकुण | १९ | ०६ | **२५** | **१४** | **११** |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक

पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. ३३ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. १११ व ११२ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४८ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी - ३ | नर्स /परिचारीका | नामनिर्देशन ७५ % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिग कौन्सीलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क) शासकीय / निमशासकीय खासगी रुग्णालयातील परिचारिका म्हणुन ३ वर्षाचा अनुभव आवश्यक .<br>ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |
| ११२ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी -३ | नर्स (ए.एन.एम.) (मिडवाईफरी/ नर्स (ए.एन.एम.) | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची माध्यमिक शालांत परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए. एन. एम. अभ्यासक्रम पुर्ण व त्यानंतर कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार

विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन

ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु

नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात

येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या परिचारीका यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | आर. ए.एन.एम. |
| २ | अपर्णा विलास चाबुकस्वार | आर. ए.एन.एम. |
| ३ | सुप्रिया अर्जुन टेमकर | आर. ए.एन.एम. |
| ४ | स्वप्नाली प्रताप इंगावले | आर. जी .एन.एम. |
| ५ | अर्चना संदिप क्षत्रिय | आर. जी .एन.एम. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या परिचारीका यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या मध्ये अत्यंत कमी प्रमाणात परिचारिका असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११७६ दिनांक २१/०३/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या

स्वस्मात परिचारीका या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ३४,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,०४,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वस्मात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | अपर्णा विलास चाबुकस्वार | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ३ | सुप्रिया अर्जुन टेमकर | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ४ | स्वप्नाली प्रताप इंगावले | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ५ | अर्चना संदिप क्षत्रिय | परिचारीका | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११७६ दिनांक २१/०३/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्मात परिचारीका या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखा अधिकारी यांचा अभिप्राय कि,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.(नमुद तरतुदीसह)

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,पुर्व लेखा परीक्षण करण्यात आले.लेखा परीक्षण त्रुटी निरंक शिक्का व स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचू दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचू दाखविण्यांत आला.

मा.सौ.रूपाली वारे :- विषय क्र.१७ ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- विषय क्र१७ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना सन २०१३-१४ अंतर्गत ई निविदा क्रमांक ९४४,९४७ व ९४८ बाबतचा प्रस्ताव आजच समिती समोर सादर करीत आहे.

मा.सभापती साहेब :- कोण कोणत्या कामांचा प्रस्ताव आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- प्रभाग क्रमांक २८ मध्ये लिंक रोड ते जगताप मळा भागातील रस्ता डांबरीकरण करणे,प्रभाग क्र.२८ स्टेशन रोड भागात गाडळकर ते शहा कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे व प्रभाग क्र.१४ मध्ये बालिकाश्रम रोड ते करंदीकर हॉस्पीटल पर्यत रस्ता करणे.सदरची तीन कामे अंदाजपत्रकीय दराच्या कमी दराने आहेत.मा.आयुक्त यांनी ११/३/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे.तथापी मनपा अधिनियम २०११ प्रकरण ५ नियम २ (२) नुसार मा.स्थायी समितीला आपल्या इतिवृत्तात समाविष्ट करणेस सदरचा प्रस्ताव निर्ययास्तव तथा कार्योत्तर मंजुरीस्तव आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- या तीनही कामांची कार्योत्तर मंजूरी असल्याने मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक १७ ते १९ पुर्ननियुक्तीचे असल्याने विषय मंजूर.व नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना सन २०१३-१४ अंतर्गत ई निविदा क्रमांक ९४४,९४७ व ९४८ या कामांना कार्योत्तर मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.मंजूर,खर्च मंजूर.

स्थायी समितीमध्ये आजच सादर केलेल्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजना सन २०१३-१४ अंतर्गत ई निविदा क्रमांक ९४४,९४७ व ९४८ या कामांना कार्योत्तर मंजूरीस झालेल्या चर्चे नुसार ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- १८ सोमवार दि.३०/५/२०१६

प्रस्तावाचा विषय :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :-अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रिक सुपरवाझर यांनी त्यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ६४१ दिनांक ०१/०४/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रिक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले वरील संदर्भ क्रं.१ नुसार ७ वायरमन , संदर्भ क्रं. २ नुसार ५ वायरमन तसेच संदर्भ क्रं. ३ नुसार १ वायरमन यांना संदर्भिय कार्यालयीन आदेश सहा महिन्या करीता दिलेला होता. सदर वायरमन यांची कंत्राटी पध्दतीने केलेली मुदत दि. १९/०४/२०१६ रोजी संपत आलेली आहे. तरी कायम सुचीवर १० वायरमन असुन माहे मे २०१६ महिन्यामध्ये आणखी दोन कायम वायरमन कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. शहराच्या संपुर्ण शहर हद्दिमध्ये पथदिवे मेन्टनेन्स करीता कर्मचारी संख्या अपुरी आहे. त्याकरीता मा. महापौर साहेब यांच्या दालनातील मिटींग नुसार वरील प्रमाणे कंत्राटी करारबध्द नेमणुकीचे वायरमन वरील संदर्भिय आदेशान्वये आस्थापना विभागाने नियमानुसार कार्यवाही करुन एकुण १३ वायरमनची नेमणुक केलेली आहे. व त्याची मुदत संपुष्टात येत आहे. तरी अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रिक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेल्या १३ वायरमन यांची मुदत दिनांक १९/०४/२०१६ व वरील संदर्भिय आदेशानुसार संपत असल्याने त्यांना ६ महिन्या करीता मुदतवाढीस मंजुरी मिळणेस व आस्थापना विभागामार्फत मुदत वाढीचे कार्यालयीन आदेश काढणे बाबत " नमुद करुन सुचित केलेले आहे.

तथापि मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतेच मान्यता प्राप्त झालेली आहे. व मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २४ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ७२ मध्ये वायरमन यापदाची शैक्षणिक अर्हता नमुद केलेले आहे.

त्यानुषंगाने इलेक्ट्रीक विभाग यांना संदर्भ क्रं. २ नुसार इकडील जा.क्र.आस्था.२३६ दिनांक १८/०४/२०१६ अन्वये पत्र देवुन संदर्भिय प्रस्ताव क्रमांक १ च्या इलेक्ट्रीक विभागाकडील प्रस्तावानुसार मानधनावरील १३ वायरमनंची पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननेमणूकी बाबत सुधारीत मान्यता प्राप्त आकृतीबंधामधील शैक्षणीक पात्रते नुसार पात्र / अपात्र बाबत संबधितांची माहीती सादर करणे बाबत सुचीत केलेले होते. त्यानुसार संदर्भिय क्रं. ३ नुसार इलेक्ट्रिक सुपरवायझर यांनी त्यांचेकडील जा.क्र. विद्युत विभाग २९ दि. २२/०४/२०१६ अन्वये इकडेस पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे.त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रिक विभागाकडील कंत्राटी करार पध्दतीने नेमलेले १३ वायरमन कर्मचारी यांचे

कार्यालयीन आदेश सहा महिन्या करीता दिलेला होता. सदर वायरमन यांची कंत्राटी पध्दतीने केलेली मुदत दि. १९/०४/२०१६ रोजी संपत आलेली आहे. तरी संबधित कर्मचारी यांचा कालावधी संपत असल्यामुळे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन नियमानुसार सदर कर्मचा-यांची पुर्ननियुक्ती करण्यात यावी. तरी कायम सुचिवर १० वायरमन असुन माहे मे २०१६ महिन्यामध्ये आणखी दोन कायम वायरमन कर्मचारी वायरमन कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. शहराच्या संपुर्ण शहर हद्दीमध्ये पथदिवे मेन्टनेन्स करीता कर्मचारी संख्या अपुर्ण आहे त्याकरीता मा. महापौर साहेब यांच्या दालनातील मिटींग नुसार वरील प्रमाणे कंत्राटी कराररबध्द नेमणुकीचे वायरमन वरील संदर्भिय आदेशान्वये आस्थापना विभागाने नियमानुसार कार्यवाही करुन एकुण १३ वायरमनची नेमणुक केलेली केलेली आहे. व त्याची मुदत संपुष्टात येत आहे. तरी वरील संदर्भिय आदेशानुसार संबधित वायरमन कर्मचारी यांची शैक्षणिक पात्रते बाबत तक्ता जोडत आहे. " असे नमुद करुन सुचीत केलेले आहे. सदर सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये संबधित मानधनावरील वायरमन यांची खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रतेनुसार पात्र / अपात्र बाबती माहिती सादर केलेली असुन त्याबाबची माहिती पुढील प्रमाणे आहे.--

| अं. क्रं. | नांव | तातपुरत्या स्वरुपात पदनाम | धारण केलेली शैक्षणीक अर्हता | सुधारीत आकृतीबंधामधील शैक्षणीक पात्रतेनुसार पात्र / अपात्र |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ७ | महारपुडे कैलास भाउसाहेब | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ८ | अंकित किशोर कासवा | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ९ | शेख अजिज सत्तार | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त नाही. | पात्र |
| १२ | गायकवाड अरविंद शामराव | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | पात्र |
| १३ | खान शादाब रफिक | मानधन वायरमन | एस.एस.सी.पास. व तारतंत्री सर्टीफिकेट प्राप्त केले आहे. | **शेरा : -** जा.क्र. आस्था. १५२ दि. ०७/०४/२०१६ अन्वये शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत भरती सत्र फ्रेबुवारी १६ शिकाऊ उमेदवार म्हणून वायरमन |

इलेक्ट्रिक सुपरवायझर त्यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रिक विभाग ६४१दि.०१/०४/२०१६अन्वयेच्या अहवाला मध्ये नमुद केल्याच्या अनुषंगाने इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तातपुरत्या स्वरुपात वायरमन यापदांवर अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती / नियुक्ती केलेल्या सद्यस्थितीमध्ये संबधीतांची त्या बाबतची माहीती खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ५ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ६ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ७ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५६२१ दि.२७/१०/२०१५ | २०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १९/०४/२०१६ |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५५२५ दि.१९/१०/२०१५ | १९/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १८/०४/२०१६ |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५५२५ दि.१९/१०/२०१५ | १९/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १८/०४/२०१६ |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५५२५ दि.१९/१०/२०१५ | १९/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १८/०४/२०१६ |
| ११ | खान शादाब रफिक | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५५२५ दि.१९/१०/२०१५ | १९/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १८/०४/२०१६ |
| १२ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ५५२५ दि.१९/१०/२०१५ | १९/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १८/०४/२०१६ |
| १३ | गायकवाड अरविंद शामराव | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ७४७२ दि.२७/०१/२०१६ | २७/०१/२०१६ पासुन सहा महिन्या करीता | २६/०७/२०१६ |

जा.क्र इलेक्ट्रिक विभाग २५५ दि. २७/०८/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १९ दिनांक १४/१०/२०१५ अन्वयेच्या पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने वरील अनु. क्रं. १ ते ७ यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ५६५१ दि.२७/१०/२०१५ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन दि.२०/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दि. २० / ०४ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

तसेच मा. महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.०८/०७/२०१५ रोजी इलेक्ट्रिक विभागा कडील कामांबाबत घेतलेल्या आढावा बैठकीमधील दिलेले निर्देशाच्या अनुषंगाने इलेक्ट्रिक विभाग तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक ०९/०९/२०१५ रोजीच्या दैनिक सामना व दैनिक नगर टाईम्स यावर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार मुलाखती दि.२९ /०९ / २०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षते खाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन पात्र ठरवुन निवड केलेली होती. त्यानुषंगाने इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार वरील अनु. क्रं. ८ ते १२ यांची तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ५५२५ दि.१९/१०/२०१५ अन्वये दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दि.१९ / ०४ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

तसेच इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र.इलेक्ट्रिक विभाग ४१३ दिनांक ३०/१०/२०१५ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने वरील प्रक्रियानुसार जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक५५२५दिनांक १९/१०/२०१५अन्वयेच्या आदेशानुसार त्यामधील अनु. क्रं.३ लोळगे श्रीकांत चंद्रकांत हे अटी व शर्ती नुसार

सहा महिन्या करीता मानधनावर रूजु न झाल्याने त्यांची ऐवजी प्रतिक्षा सुचीवरील निवड झालेले वरील तक्त्यामधील अनु.क्र. १३ गायकवाड अरविंद शामराव यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ७४७२ दिनांक २७/०१/२०१६ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक २७ / ०७ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग - २) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. १९ वरील विवरण पत्र क्रमांक २४ मध्ये अनु. क्र. ५ नुसार विद्युत विभागासाठी वायरमन / तारतंत्री - ३० इतकी पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | **एकुण पदे** | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या | सद्यस्थितीमध्ये मानधनावरील कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वायरमन / तारतंत्री | १९ | ११ | **३०** | **१६** | **१३** |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २४ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ७२ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४८ | तांत्रिक सेवा श्रेणी - ३ | वायरमन / तारतंत्री | नामनिर्देशन ७५ % | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उर्तिण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार

विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यंत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन

ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु

नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात

येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील विद्युत विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वायरमन यापदांवर अटी व शर्तीच्या अनुषंगाने सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

उपरोक्त इलेक्ट्रिक सुपरवायझर, इलेक्ट्रिक विभाग यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग २९ दिनांक २२/०४/२०१६ अन्वयेच्या पत्रान्वये अहवालामधील अनु. क्रं. १३ खान शादाब रफिक यांची जा.क्र.आस्था. ०७/०४/२०१६ अन्वये शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत भरती सत्र फेब्रुवारी २०१६ मध्ये शिकाऊ उमेदवार म्हणुन नियुक्ती झालेली असल्याने त्यांची पुढील मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत विचार करता येणार नाही.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील विद्युत विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वायरमन यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये विद्युत विभागामध्ये अत्यंत कमी प्रमाणात वायरमन असल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ६४१ दिनांक ०१/०४/२०१६ व जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग २९ दिनांक २२/०४/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन खालील तक्त्यामधील कॉलम नं. ६ मध्ये नमुद केलेल्या दिनांकांपासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये १, १४,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ६, ८४,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण | तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन नमुद दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता पुर्नेनेमणूक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ७ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२३/०४/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२२/०४/२०१६ पासुन पासुन सहा महिन्या करीता |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२२/०४/२०१६ पासुन पासुन सहा महिन्या करीता |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२२/०४/२०१६ पासुन पासुन सहा महिन्या करीता |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.२२/०४/२०१६ पासुन पासुन सहा महिन्या करीता |
| १२ | गायकवाड अरविंद शामराव | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग | दि.३०/०७/२०१६ पासुन पासुन सहा महिन्या करीता |

इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग ६४१ दिनांक ०१/०४/२०१६ व जा.क्र. इलेक्ट्रिक विभाग २९ दिनांक २२ /०४ / २०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन वरील दर्शविलेल्या कॉलम नं. ६ मध्ये दर्शविलेल्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.,यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी,यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव,यावर मुख्यलेखापरीक्षक यांची स्वाक्षरी, यावार मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी ,यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.रूपाली वारे :- विषय क्र.१७ ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- विषय क्र१७ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक १७ ते १९ पुर्ननियुक्तीचे असल्याने विषय मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- १९ सोमवार दि.३०/५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्वनियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११८ दि. ०९/०५/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र. आस्थापना नेमणुक ५६७६ दि.३०/१०/२०१५ अन्वये डॉ. सौ. रेखा पाटील यांची स्त्रीरोग तज्ञ कै. बा. दे. दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने सहा महिन्या करिता नेमणूक करण्यात आलेली होती. मात्र सदर वैद्यकिय अधिकारी ह्या एक महिन्या उशीराने दि. ३०/११/२०१५ रोजी ड्युटीवर हजर झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या नेमणूक कालावधीबाबतीत संभ्रम निर्माण झाल्याने त्यांच्या पुर्ननेमणूकीचा प्रस्ताव सादर करणेस उशीर झालेला आहे. त्यांचा नेमूणक आदेशा नुसार नेमणूक कालावधी दि.३०/०४/२०१६ रोजी संपलेला आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. सध्या दवाखान्यामध्ये जननी शिशु सुरक्षा योजना कार्यान्वीत असुन रुग्णांना गर्दी प्रंचड वाढलेली आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दि.०३/०५/२०१६ पासुन सहा महिन्या करिता स्त्रीरोग तज्ञ कै. बा.दे.दवाखाना यापदावर पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे. " असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ९२५ दि.०३ /०२/२०१५ व २४ दि. १०/०४/२०१५ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दि.०९/०५/२०१५ रोजीच्या दैनिक पुढारी व दैनिक सार्वमत या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दि. २२ /०५/२०१५ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने दि.२२ /०५/ २०१५ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष,निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड व प्रतिक्षा सुचीवरील उमेदवारांची निवड केलेली होती.

त्यानुसार निवड झालेल्या व प्रतिक्षा सुचिवरील निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी हि अहमदनगर महानगरपालिकेच्या नोटीस फलकावर जा.क्र.आस्था. १०८७ दि.२२/०५/२०१५ अन्वये दि. २२/०५/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. वरील निवड झालेल्या संबधितांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक १२८० दि. ३० / ०५ /२०१५ अन्वये सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर कै.बा.दे.दवाखान्यामध्ये करारबध्द नेमणूक करण्यात आलेली होती. सदर आदेशामधील अनु. क्रं. १ डॉ. स्मिता सुदाम गावडे यांनी दि. १/१०/२०१५ रोजी अर्ज देवुन सदर सहा महिन्याच्या कालावधीतील मानधनावरील करारबध्द नियुक्ती सेवेचा राजीनामा दिलेला होता.

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ९२५ दि. ०३/०२/२०१५ व २४ दि. १०/०४/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर भरती प्रक्रियामधील प्रतिक्षा सुचीवरील निवड झालेले अनु. क्रं. १ डॉ. रेखा अक्षयदिप पाटील यांची कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती केलेली असुन सद्यस्थितीमध्ये त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. रेखा अक्षयदिप पाटील | स्त्रीरोग तज्ञ | कै.बा.दे. दवा. | जा.क्र. ५६७६ दि.३०/१०/२०१५ | ३०/१०/१५ ते २९/०४/१६ | ३५,०००/- |

वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ५६७६ दिनांक ३०/१०/२०१५ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक ३० / ०४ / २०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ५ नुसार रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी स्त्रीरोग तज्ञ हे मंजुर पद संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | सद्यस्थितीमध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ५ | स्त्रीरोग तज्ञ | | १ | १ | --- |
| एकुण | | ------ | १ | १ | --- |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. ३१ वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. १०० नुसार खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १०० | आरोग्य सेवा श्रेणी - १ | स्त्रीरोग तज्ञ | नामनिर्देशन १०० % | ३५ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. डी. (स्त्री व प्रसृतीरोग शास्त्र) किंवा एम.बी.बी.एस. , डी.जी.ओ. किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील संबधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

**६)** अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित
केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

**७)** नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती
प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली
प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे

कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | डॉ. रेखा अक्षयदिप पाटील | एम.बी.बी.एस. डी.जी.ओ. | आहे |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबतः महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्या मध्ये अत्यंत कमी प्रमाणात स्त्रीरोग तज्ञ असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११८ दिनांक ०९/०५/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०५/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ३५,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. रेखा अक्षयदिप पाटील | स्त्रीरोग तज्ञ | ३५,०००/- | कै.बा.दे.दवा. |

प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवा. प्रमुख यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ११८ दिनांक ०९/०५/२०१६ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०५/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्वनियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचू दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचू दाखविण्यांत आला.

मा.सौ.उषा नलवडे :- विषय क्र.१७ ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- विषय क्र१७ते १९ हे पुर्ननियुक्तीचे असल्याने सर्व विषय मंजूर करावे.

मा.श्री.सभापती साहेब :- विषय क्रमांक १७ ते १९ पुर्ननियुक्तीचे असल्याने विषय मंजूर.

**ठराव :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ यापदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्वनियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- २० सोमवार दि.३०/५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३० प्रभाग क्र.३० मधील आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर. सी. सी. पाईपची पावसाळी गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.विभागीय आयुक्त,नाशिक यांची दि.६/०१/२०१६रोजीची मान्यता

२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन.२०१३-१४

३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १२३०व१२३१ सन २०१५-१६

४] निविदा विक्री कालावधी :- दि.०९/०२/२०१६ ते दि.२३/०२/२०१६

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२६/०२/२०१६ ते दि.२९/०२/२०१६

६] निविदा उघडण्याची तारीख :- १६/०३/२०१६ ते १७/०३/२०१६

७] कामाची मुदत :- मुदत ४ महिने

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | ठेकेदाराने दिलेल्या अर्जानुसार देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सां.बां.वि./ई - निविदा क्र.१२३० २०१५-१६ | प्रभाग क्र.३० मध्ये आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर.सी.सी.पाईपची पावसाळी गटर बांधणे. | ५९,५६,६८२/- | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर | ७.९९ % जादा दराने | निविदा दर |
| सां.बां.वि./ई - निविदा क्र.१२३० २०१५-१६ | प्रभाग क्र.३० मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसित करणे. | ६५,५२,३९६/- | मे.ए.सी.कोठारी अहमदनगर | १०.५९% जादा दराने | निविदा दर |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने ई- निविदा क्र.१२३० करिता मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ७.९९**% जादा दराने** व ई निविदा क्र.१२३१ करिता मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १०.५१%जादा दराने असुन सदरचा देकार अवाजवी वाटत असल्याने संबंधित निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर व मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांनी दि.२४/०५/२०१६ रोजीच्या लेखी अर्जानुसार सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेनुसार सदरचे काम ई- निविदा क्र.१२३० करिता मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अहमदनगर व ई निविदा क्र.१२३१ करिता मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांना निविदा दराने देणेस मंजूरीस्तव व सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,यशस्वी निविदा धारकांची कमी मात्र स्तंभ क्र.५ प्रमाणे जादा दराची निविदा प्राप्त झाल्या.मात्र दि.२४/५/२०१६ चे पत्रान्वये यशस्वी निविदाधारक यांनी उपरोक्त नमुद कामे अंदाजपत्रकीय दराने करणेची लेखी संमती दिलेली आहे.

तरी सदरचे निविदा दर अंतिम होणेसाठी मा.स्थायी समितीची आवश्यकता आहे.करिता सदरचे प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि, प्रस्तावानुसार व अंदाजपत्रकीय तरतुदीस अनुंषागाने मान्यतेस्तव सादर.मा.स्थायी समितीस सादर करावे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः-प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-१६अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३०प्र.क्र.३०मधील आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर सी सी पाईपची पावसाळी गटर करणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या कामाची वर्कऑर्डर केव्हा देणार आहे.

शहर अभियंता श्री.व्ही.जी. सोनटक्के :- ठराव आल्या नंतर त्वरीत पुट अप केली जाईल.

मा.सभापती साहेब :- कामाची मुदत किती दिवसांची आहे.

शहर अभियंता श्री.व्ही.जी. सोनटक्के :- ऑगस्ट अखेरीपर्यत कामाची मुदत आहे.

मा.सभापती साहेब :- काम लवकर सुरू करणे बाबत ठेकेदारास सुचना देण्यात याव्यात.नाहीतर ठेकेदार रस्ता खोदुन ठेवतात. सहा-सहा महिने काम करीत नाहीत.त्यामुळे परिसरातील नागरीकांची गैरसोय होते.

मा.सौ.उषा नलावडेः-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३० प्रभाग क्र.३० मधील आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर सी सी पाईपची पावसाळी गटर करणे बाबत कामाची निविदा मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर हे दि.२४/०५/२०१६ रोजीच्या लेखी अर्जानुसार सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेनुसार सदरचे काम ई- निविदा क्र.१२३० करिता मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अहमदनगर यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलावडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक- २१ सोमवार दि.३०/५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३१ प्रभाग क्र.३०मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.विभागीय आयुक्त,नाशिक यांची दि.६/०१/२०१६रोजीची मान्यता.
२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन.२०१३-१४
३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १२३० व १२३१ सन २०१५-१६
४] निविदा विक्री कालावधी :- दि.०९/०२/२०१६ ते दि.२३/०२/२०१६
५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२६/०२/२०१६ ते दि.२९/०२/२०१६
६] निविदा उघडण्याची तारीख :- १६/०३/२०१६ ते १७/०३/२०१६
७] कामाची मुदत :- मुदत ४ महिने
८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | ठेकेदाराने दिलेल्या अर्जानुसार देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सां.बां.वि./ई - निविदा क्र.१२३० २०१५-१६ | प्रभाग क्र.३० मध्ये आचल रेसिडेन्सी ते समता कॉलनी ते सौरभ कॉम्प्लेक्स ते महानगरपालिका झोन ऑफिसपर्यत आर.सी.सी.पाईपची पावसाळी गटर बांधणे. | ५९,५६,६८२/- | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर | ७.९९ % जादा दराने | निविदा दर |
| सां.बां.वि./ई - निविदा क्र.१२३० २०१५-१६ | प्रभाग क्र.३० मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसित करणे. | ६५,५२,३९६/- | मे.ए.सी.कोठारी अहमदनगर | १०.५१% जादा दराने | निविदा दर |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने ई- निविदा क्र.१२३० करिता मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **७.९९% जादा दराने** व ई निविदा क्र.१२३१ करिता मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १०.५१%जादा दराने असुन सदरचा देकार अवाजवी वाटत असल्याने संबंधित निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर व मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांनी दि.२४/०५/२०१६ रोजीच्या लेखी अर्जानुसार सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेनुसार सदरचे काम ई- निविदा क्र.१२३० करिता मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अहमदनगर व ई निविदा क्र.१२३१ करिता मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांना निविदा दराने देणेस मंजूरीस्तव व सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,यशस्वी निविदा धारकांची कमी मात्र स्तंभ क्र.५ प्रमाणे जादा दराची निविदा प्राप्त झाल्या.मात्र दि.२४/५/२०१६ चे पत्रान्वये यशस्वी निविदाधारक यांनी उपरोक्त नमुद कामे अंदाजपत्रकीय दराने करणेची लेखी संमती दिलेली आहे.

तरी सदरचे निविदा दर अंतिम होणेसाठी मा.स्थायी समितीची आवश्यकता आहे.करिता सदरचे प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि, प्रस्तावानुसार व अंदाजपत्रकीय तरतुदीस अनुंषागाने मान्यतेस्तव सादर.मा.स्थायी समितीस सादर करावे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३१ प्र.क्र.३०मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत करणे प्रस्ताव आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या कामाची वर्कऑर्डर केव्हा देणार आहे.वर्कऑर्डर लवकर देण्यात यावी.कोणत्याही कारणास्तव विलंब करू नये.

शहर अभियंता श्री.व्ही.जी. सोनटक्के :- ठराव प्राप्त झाल्यानंतर वर्कऑर्डर देण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- मी ठराव त्वरीत देण्यात येईल.

मा.सौ.उषा नलावडेः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. श्रीपाद छिंदमः-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** प्राथमिक सोयी सुविधा विकास कार्यक्रम सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्रमांक १२३१ प्रभाग क्र.३०मधील साईनगर ओपन स्पेसमध्ये उद्यान विकसीत करणेबाबत कामाची निविदा मे.ए.सी.कोठारी अहमदनगर हे दि.२४/०५/२०१६ रोजीच्या लेखी अर्जानुसार सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेनुसार सदरचे काम ई- निविदा क्र.१२३१ करिता मे.ए.सी.कोठारी अहमदनगर यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा नलावडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका